खाजगी आणि वैयक्तिक कामे करण्यासाठी
चतुर्थ श्रेणी शासकीय कर्मचारी व इतर कनिष्ठ
शासकीय कर्मचारी यांच्या सेवेचा वापर करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
परिपत्रक क्र. विभाआ/विपभा /१०९१/ प्र. १६८/ई-७
मंत्रालय, मुंबई -४०००३२ दिनांक ७ मार्च १९९१.

संदर्भ:- १] शासन परिपत्रक, राजनैतिक व सेवा विभाग क्र. २६०९/३४ दि. २५-७-४६

२] शासन परिपत्रक, राजनैतिक व सेवा विभाग, क्रमांक २६०९/३४, दि. ७ जून, १९५५.

३] शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, सीडीआर १०८१/१९६१/५५ अकरा दि. १/९/८६

**परिपत्रक:-** चतुर्थश्रेणी शासकीय कर्मचारी आणि इतर कनिष्ठ तसेच शासकीय कर्मचारी यांनी अधिकाऱ्यांच्या घरी खाजगी व वैयक्तिक कामे करण्याविषयी वर, उद्धृत केलेल्या परिपत्रकान्वये सविस्तर सूचना काढल्या आहेत. चतुर्थश्रेणी शासकीय कर्मचारी किंवा इतर कनिष्ठ तसेच शासकीय कर्मचारी यांनी शासकीय अधिकाऱ्यांच्या घरी त्यांची खाजगी अथवा वैयक्तिक कामे करण्यास नकार अथवा नापसंती दर्शविली तर त्यांना सदर कामे सक्तीने करावयास लावणे ही गैरवर्तणूक होईल. अशी उदाहरणे जर शासनाच्या निदर्शनास आली तर त्याची गंभीर दखल घेण्यात येऊन संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. (सोबत त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांना आवश्यक त्या सूचना देऊन उपरोक्त परिपत्रकांच्या प्रती जोडल्या आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

[ त्रि. रा. कर्वे ]

कक्ष अधिकारी,
महसूल व वन विभाग.

21 MAR 1991

सहपत्र:- वरील प्रमाणे

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,

UTILISATION OF SERVICES OF PEONS AND OTHER INFERIOR SERVANTS FOR PRIVATE AND PERSONAL WORK

G.C.M., P.& S. D.No.2609/34, dated 25th July 1946.

G.C.M., P.& S. D.No.2609/34, dated 7th June 1954.

Since the peons are under no obligation to undertake private work for their officers, they would be entirely justified in refusing to do such work if they did not wish to perform it and that they must not be liable to transfer on account of such refusal. There is no objection to peons undertaking in return for adequate remuneration, small duties of a personal character, provided such duties are undertaken by the peons willingly and do not interfere with Government work and that no peons should, however, in any circumstances, be required to do what is commonly known as domestic service, i.e, he should not be employed as Mali, Dhobi, Cook, Butler, etc. Peons attached to Government Officers or working at the residences of officers do not always have full time work as the official work for which they are intended is not generally adequate to keep them busy for the whole day and Government has no objection if their services during the spare time are utilised by Government officers for their private work including domestic work provided the peons are willing to undertake such work and are given adequate extra remuneration for it by the officers. These instructions should be observed scrupulously by Government Officers.

---

खाजगी आणि वैयक्तिक कामे करण्यासाठी चतुर्थ श्रेणी शासकीय कर्मचारी व इतर कनिष्ठ शासकीय कर्मचारी यांच्या सेवांचा वापर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक सीडीआर-१०८६/१२३१/५४/अकरा,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १ सप्टेंबर १९८६.

पहा: १) शासन परिपत्रक, राजनैतिक व सेवा विभाग, क्रमांक २६०९/३४, दिनांक २५ जुलै १९५६.
२) शासन परिपत्रक, राजनैतिक व सेवा विभाग क्रमांक २६०९/३४, दिनांक ७ जून १९५७.

परिपत्रक :

चतुर्थश्रेणी शासकीय कर्मचारी आणि इतर कनिष्ठ दर्जाचे शासकीय कर्मचारी यांनी अधिकाऱ्यांच्या घरी खाजगी व वैयक्तिक कामे करण्याविषयी वरउद्धृत केलेल्या परिपत्रकान्वये (प्रती जोडल्या आहेत) सविस्तर सूचना काढल्या आहेत. या सूचनांचा पुनरुच्चार करुन शासन असे निदेश देत आहे की, चतुर्थश्रेणी शासकीय कर्मचारी किंवा इतर कनिष्ठ दर्जाचे शासकीय कर्मचारी यांनी शासकीय अधिकाऱ्यांच्या घरी त्यांची खाजगी अथवा वैयक्तिक कामे करण्यास नकार अथवा नापसंती दर्शविली तर त्यांना सदर कामे सक्तीने करावयास लावणे ही गैरवर्तणूक होईल. अशी उदाहरणे शासनाच्या निदर्शनास आली तर त्याची गंभीर दखल घेण्यात येऊन संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

२. सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांनी या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

मीना करंडे,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्र्यांचे सचिव,
सर्व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
*प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्यायशाखा, मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील विभागप्रमुख व कार्यालय प्रमुख.
सामान्य प्रशासन विभाग, का.क्र. ८, ९, ९-अ, १०,अ, २२, २८, २८-अ, ३१ व ३४.
सर्व मंत्रालयीन विभाग,
निवड फाईल
*पत्राने.